# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ३१.०१.२०२५

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ३०/०१/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५३,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ३०/०१/२०२५ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०७ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ९४,४४०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ (COPTA 2003) अंतर्गत विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्य दि. ३०/०१/२०२५ रोजी सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ अन्वये हिंगोली जिल्हा येथे एकुण ०६ ठिकाणी कलम ५, २२ अन्वये गुन्हे दाखल झाला असुन एकुण मिळालेला माल ७,८५५/— रू यातील आरोपी हा शासनाने विशिष्ट क्षेत्रा मध्ये प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य वस्तु व सिगारेट/तंबाखु जन्य पदार्थ साठुन वितरीत करीत असतांना मुदेमालासह मिळुन आला म्हणुन गुन्हा.